उद्योग उपसंचालक (तांत्रिक) (गट-अ) या संवर्गाची दिनांक ०१.०१.२०२५ रोजीची तात्पूरती ज्येष्ठतासूची प्रसिध्द करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग,
शासन परिपत्रक क्र.ज्येष्ठता-२०२५/११५/प्र.क्र.३८/उद्योग-३
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
विस्तार इमारत, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ०६ मार्च, २०२५

वाचा:- १) सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना दि.२१.६.२०२१.
२) विभागाचे शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२४/प्र.क्र.१९०/उद्योग-३, दि.२९.०१.२०२५
३) शासन आदेश क्र. पदोन्न २०२४/प्र.क्र.३२/उद्योग-३, दि.१४.१०.२०२४
४) उद्योग संचालनालयाचे पत्र क्र.उसं/आस्था-१/ज्ये.सू./उउसं (तां) (गट- अ) / २०२५/अे-१५९, दि. १८.०२.२०२५

शासन परिपत्रक :-

उद्योग संचालनालयाच्या आस्थापनेवरील "उद्योग उपसंचालक (तांत्रिक), (गट-अ)" या संवर्गाची दिनांक ०१.०१.२०२४ रोजीची अंतिम ज्येष्ठतासूची संदर्भीय क्र. २ च्या शासन परिपत्रकान्वये प्रसिध्द करण्यात आली आहे.

२. सन २०२४ या कॅलेंडर वर्षात "उद्योग उपसंचालक (तांत्रिक), गट-अ" या संवर्गामध्ये संदर्भ क्र. ३ येथील शासन आदेशान्वये पदोन्नत झालेल्या शासकीय अधिकाऱ्यांची नावे समाविष्ठ करुन उद्योग उपसंचालक (तांत्रिक), गट-अ संवर्गाची दि.०१.०१.२०२५ रोजीची तात्पूरती ज्येष्ठतासूची सोबतच्या परिशिष्ठ-३ प्रमाणे प्रसिध्द करण्यात येत आहे.

३. विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई यांना विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक हे त्यासोबतच्या ज्येष्ठतासूचीत समाविष्ट असलेल्या सर्व अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणावे. सर्व कार्यालय प्रमुखांनी या ज्येष्ठतासूचीतील माहिती सेवापुस्तक व अन्य उपलब्ध अभिलेखावरुन तपासून बरोबर असल्याचे प्रमाणित करावे. या ज्येष्ठतासूचीत काही वास्तविक चुका अथवा त्रुटी राहिल्या असतील तर त्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांचे निवेदन विहित मार्गाने हे परिपत्रक प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत शासनास सादर करावे. त्यानंतर प्राप्त झालेल्या निवेदनांचा विचार करण्यात येणार नाही.

४. मा.उच्च न्यायालयाने याचिका क्र. २७९७/२०१५ वर दिलेल्या न्यायनिर्णयानुसार तसेच, यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ वरील

अंतिम न्यायनिर्णयानुसार सन २००४ नंतरच्या निवडयाद्यांमध्ये बदल झाल्यास, त्यानुसार सदर ज्येष्ठतासूचीमध्ये बदल होईल.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२५०३०६१४३५२५२५१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SHASHANK TUKARAM CHAVAN

Digitally signed by SHASHANK TUKARAM CHAVAN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRIES ENERGY LABOUR AND MINING DEPARTMENT, 2.5.4.20=7dd1791f8c7f2d8cbabbae6c3c11ac3d4fe93ccab49daf36ff24dacd585e2276, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=A089DF063F1FFA9C6E2D052DB3C26C5B1ECE40048A4A7D39615BEE66D9E2053D, cn=SHASHANK TUKARAM CHAVAN
Date: 2025.03.06 14:38:05 +05'30'

(शशांक चव्हाण)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

सोबत :- परिशिष्ट-३

प्रति,

१) विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई.

२) संबंधित अधिकारी - (द्वारा-विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई.

३) निवडनस्ती (उद्योग-३)

शासन परिपत्रक क्र. ज्येष्ठता-२०२५/प्र.क्र.३८/उद्योग-३ सोबतचे परिशिष्ठ-तीन

दरवर्षी ज्येष्ठता यादी प्रसिध्द करण्याचा विहित नमूना (नियम ५)

१. संवर्गाचे नाव -उद्योग उपसंचालक (तांत्रिक) (गट अ)

२. वेतन श्रेणी - एस-२०, ५६१००-१७७५००

३. दि.१ जानेवारी २०२५ रोजीची तात्पुरती ज्येष्ठतासूची (दि.१.१.२०२४ ते ३१.१२.२०२४ या कालावधीत कार्यरत कर्मचाऱ्यांची तात्पुरती ज्येष्ठतासूची)

अ.क्र.	नियम ३ (२) (ब) नुसार ज्येष्ठता क्रमांक	शासकीय अधिकाऱ्याचे नाव	संबंधीत पदावर नियुक्तीचा मार्ग	जन्मदिनांक	प्रवर्ग	नियम ३ (२) (अ) नुसार संवर्गात प्रत्यक्ष रुजू दिनांक	ज्येष्ठतेचा दिनांक	सेवानिवृत्तीचा दिनांक	शैक्षणिक अर्हता	शेरा
१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११
१	३२	श्री. क.पा.जैन	पदोन्नती	०९.०५.१९८९	खुला	१६.१०.२०२४	१५.१०.२०२४	३१.०५.१९४७	बी.ई (इलेक्ट्रानिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन)	शासन आदेश क्र. पदोन्न-२०२४/प्र.क्र.३२/उद्योग-३, दि.१४.१०.२०२४ अन्वये तात्पुरती पदोन्नती
२	३३	श्री. अ.अ.आजगेकर	पदोन्नती	२१.०९.१९८९	खुला	०१.०१.२०२५	१५.१०.२०२४	३०.०९.२०४७	बी.टेक. (कॉम्प्युटर इंजि.)	शासन आदेश क्र. पदोन्न-२०२४/प्र.क्र.३२/उद्योग-३, दि.१४.१०.२०२४ अन्वये तात्पुरती पदोन्नती
३	३४	श्री. वि.पुं. खिराळे	पदोन्नती	२१.०६.१९९०	वि.जा.(अ) (वैध)	२३.१०.२०२४	१५.१०.२०२४	३०.०६.२०४८	बी.टेक. (केमिकल इंजि.)	शासन आदेश क्र. पदोन्न-२०२४/प्र.क्र.३२/उद्योग-३, दि.१४.१०.२०२४ अन्वये तात्पुरती पदोन्नती
४	३५	श्री. सं.च.बनसोड	पदोन्नती	०५.१०.१९८८	अन.जाती(वैध)	१५.१०.२०२४	१५.१०.२०२४	३१.१०.२०४६	बी.टेक. (कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड इंजि.)	शासन आदेश क्र. पदोन्न-२०२४/प्र.क्र.३२/उद्योग-३, दि.१४.१०.२०२४ अन्वये तात्पुरती पदोन्नती
५	३६	श्री. स.र.मेमाणे	पदोन्नती	११.०७.१९८९	अनु.जमाती (वैध)	२२.१०.२०२४	२२.१०.२०२४	३१.०७.२०४७	बी.टेक (मेकॅनिकल)	शासन आदेश क्र. पदोन्न-२०२४/प्र.क्र.३२/उद्योग-३, दि.१४.१०.२०२४ अन्वये तात्पुरती पदोन्नती

SHASHANK TUKARAM CHAVAN

Digitally signed by SHASHANK TUKARAM CHAVAN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRIES ENERGY LABOUR AND MINING DEPARTMENT, 2.5.4.20=7dd1791f8c7f2d8cbabbae6c3c11ac3d4fe93ccab49daf36ff24dacd585e2276, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=A089DF063F1FFA9C6E2D052DB3C26C5B1ECE40048A4A7D39615BEE66D9E2053D, cn=SHASHANK TUKARAM CHAVAN
Date: 2025.03.06 14:38:43 +05'30'

(शशांक चव्हाण)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन